महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सावली (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील सर्व गावे सहायक अभियंता कार्यालयास जोडण्याबाबत

(१) ८६८०२ (०९-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्याकरीता स्वतंत्र सहायक अभियंता कार्यालय असून या कार्यालयास सावली तालूक्यातील सर्व गावे जोडणे आवश्यक असतानाही सावली तालूक्यातील पाथरी सर्कलची सर्व ४० ते ५० गावे अद्यापही सिंदेवाही (ता.सिंदेवाही) या कार्यालयाशी संलग्न असल्यामूळे पाथरी सर्कलमधील हजारो वीज ग्राहकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची माहिती दि. १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावली तालूक्यातील पाथरी सर्कलची सर्व ४० ते ५० गावे हे सिंदेवाही कार्यालयातून वगळून सहायक अभियंता कार्यालय सावली या कार्यालयास जोडण्यात यावे असा सविस्तर प्रस्ताव अधिक्षक अभियंता, चंद्रपूर यांनी तयार करून अंतिम मंजूरी करीता कार्यकारी संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यालय प्रकाशगड मुंबई येथे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आला असूनही सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवून अद्यापही मंजूरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावास तातडीने मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

याबाबत असे नमूद करण्यात येते की, सिंदेवाही ग्रामीण शाखा कार्यालयातील उपरोक्त गावे व सिंदेवाही शहर शाखा कार्यालयातील काही गावे घेवून सावली तालुक्याकरिता नवीन पाथरी शाखा कार्यालय प्रस्तावित करण्यात आले आहे. परंतु सदर गावांच्या पुनर्बांधणी मुळे विद्यमान सिंदेवाही शहर शाखा कार्यालयातील ग्राहक संख्या ग्राहक महावितरणद्वारा विहीत मानंकाच्या निकषानुसार कमी होत असल्यामुळे सदरचा प्रस्ताव निकष पूर्ण करीत नसल्याने मंजूरी देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा विधानसभा मतदार संघातील ३३ केव्ही उपकेंद्र अद्ययावत करण्याबाबत

(२) ८६९२९ (०९-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा विधानसभा मतदार संघातील ३३ केव्ही उपकेंद्राचे अद्यावतीकरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उर्जा मंत्री यांना दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोताळा व बुलडाणा (जि.बुलडाणा) येथील ३३ केव्ही उपकेंद्रांचे अद्यावतीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) बुलढाणा तालुक्यामध्ये ३३ के.व्ही. उपकेंद्राचे सक्षमीकरण व नवीन उपकेंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी रु.६९८.२६ लक्षचा खर्च करण्यात आला असून ३३ केव्ही उपकेंद्राचे सक्षमीकरण व नवीन उपकेंद्रासाठी रु.२८८.९० लक्षची कामे प्रस्तावित आहेत. तसेच मोताळा तालुक्यामध्ये ३३ केव्ही उपकेंद्राचे सक्षमीकरण व नवीन उपकेंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी रु. १६२.६० लक्षचा खर्च करण्यात आलेला आहे. व ३३ केव्ही उपकेंद्राचे सक्षमीकरण व नवीन उपकेंद्रासाठी रु.३९८.९८ लक्षची कामे प्रस्तावित आहेत. तसेच सोयगांव येथे ३३/११ केव्ही उपकेंद्र दिनांक ११.०९.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिराळा येथील चरण, मणदूर व टाकवे ही तीन गावठाणे फीडर विभक्त करुन स्वतंत्र फीडर निर्माण करण्याबाबत

(३) ८८८०८ (०९-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील शिराळा उपविभागामधील चरण, मणदूर व टाकवे ही तीन गावठाणे फीडर विभक्त करुन शेती पंपासाठी स्वतंत्र पंप बसविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.उर्जा मंत्री यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही हे काम अपूर्ण असून सदर काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन ज्या कंत्राटदारास हे काम देण्यात आले होते त्यांच्याकडूनच काम पूर्ण करुन घेण्याबाबत अधिक्षक अभियंता, सांगली सर्कल यांनी त्यांचा अहवाल मा. मुख्य अभियंता, कोल्हापूर यांना सादर केला आहे,
(३) असल्यास, सन २०१४ पासून प्रलंबित असलेले सदरहू काम उक्त कंत्राटदाराकडून त्वरित पूर्ण करुन घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सद्यस्थितीत सांगली जिल्हयातील शिराळा उपविभागामधील गवळेवाडी येथे नवीन कृषी वाहिनी झाल्याने, चरण येथील कृषी वाहिनी विलगीकरणाचे अंशत: काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे या भागातील पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ग्राहकांना व मंजूरी प्रक्रियेत असणाऱ्या ग्राहकांना गवळेवाडी येथून वीज पुरवठा देण्यासाठी त्यांचा HVDS योजनेमध्ये समावेश असून काही ग्राहकांना मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेत लाभ देण्याचे नियोजित असून त्याची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिंचपूर (जि.अमरावती) या गावात नियमित पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने स्वतंत्र एक्स्प्रेस फीडरवरुन जोडणी देण्याबाबत

(४) ८८८७६ (०९-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील वर्धा प्रकल्प अंतर्गत चिंचपूर हे नवीन पूनर्वसित गांव असून याठिकाणी नियमित पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने धामणगांव रेल्वे नगरपरिषदेकडून त्यांचे पाणी पुरवठा योजनेसाठी एक्स्प्रेस फीडरवरुन कनेक्शन घेण्यासाठी परवानगी मिळणार नसल्याने चिंचपूर करीता स्वतंत्र एक्स्प्रेस फीडरवरुन कनेक्शन घेणे आवश्यक असल्याचे माहे एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिंचपूर प्रकल्पवासिंयाकरिता आवश्यक एक्स्प्रेस फीडर नसल्याने नागरिकांना ४ दिवसाआड पाणी मिळत असल्याने त्यांची अपु-या पाणीपुरवठया अभावी गैरसोय होत असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) चिंचपूर प्रकल्प वासीयांकरिता आवश्यक असलेल्या ११ के.व्ही. एक्सप्रेस फिडरचे अंदाजपत्रक महावितरण डीडीएफ १००% योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आले असून कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प, वर्धा यांनी सदर रक्कमेचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीवर्धन तालुक्यातील (जि.रायगड) महा-ई सेवा केंद्रात झालेल्या गैरव्यवहार

(५) ९११७२ (०९-०८-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील ग्राहकांना सुलभ सेवा उपलब्ध होण्यासाठी ई-सेवा केंद्रे सुरू करण्यात आली मात्र श्रीवर्धन तालुक्यातील (जि.रायगड) ऑटोमॅक्स टेक्नोलॉजी प्रा.लि. या कंपनीने ई-सेवा केंद्राच्या नावाखाली वीज ग्राहकांकडून घेतलेल्या २२ लाखांच्या रक्कमेत गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरण हे महावितरणकडून देयकांची नोटीस वीज ग्राहकांना आल्यानंतर उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने संबंधित यंत्रणेची चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१९) : (१) हे खरे आहे. श्रीवर्धन तालुक्यामध्ये महा ई-सेवा केंद्र चालविणारे कंत्राटदाराने ग्राहकांच्या बिलांची रक्कम ऑटोमॅक्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीचे सॉफ्टवेअर वापरुन. या कंपनीच्या खात्यावर जमा केली. त्यामुळे सदर बिलांची रक्कम महावितरणकडे जमा न झाल्यामुळे ग्राहकांना पुढील महिन्यात थकबाकी लागून आली.
(२) हे खरे आहे.
(३) ग्राहकांची प्रलंबित थकीत वीज बिलांची रक्कम दंडासहीत सुमारे रु २०.५६ लाख महावितरण कंपनीच्या ग्राहकांच्या खात्यावर जमा केली आहे. वीज ग्राहकांची फसवणूक श्री. जितेंद्र माळी, रा.श्रीवर्धन यांच्याकडून झाली असून वीज बिलाच्या रक्कमेचा व्यवहार संबंधित वीज ग्राहक व जितेंद्र माळी यांच्यात झाला आहे व यांसंबंधित महावितरण कंपनीकडे

ग्राहकांकडून कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यामुळे पोलीस कारवाई करण्यात आली नाही. तसेच कार्यकारी अभियंता, महावितरण, गोरेगाव यांनी दिनांक १५.०३.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना श्रीवर्धन येथील महा ई-सेवा केंद्राची वीज बिल भरणा सुविधेची मान्यता रद्द करण्याची शिफारस केली असून सदर महा ई-सेवा केंद्रात वीज बिल भरणा सुविधा बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला, वाशिम व बुलढाणा या तीन जिल्हयात शासनाने केलेल्या वीज भारनियमाबाबत

(६) ९१३९२ (०९-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकोला, वाशिम व बुलढाणा या तीन जिल्हयात शासनाने मोठया प्रमाणात केलेल्या वीज भारनियमामुळे सुमारे २ लाख ४६ हजार शेतक-यांच्या कृषी पंपाना वीज पुरवठा न झाल्याने उन्हाळी पिके पाण्याअभावी सुकून त्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर भारनियमन कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) व (२) वीज उपलब्धतेत वाढ करणचा कालबध्द कार्यक्रम योग्य रितीने अंमलात आणल्याने तसेच वीज वितरणासाठी सक्षम प्रणाली उभारल्याने महावितरणच्या वीज उपलब्धतेत वाढ झाली. त्यामुळे राज्यात माहे मार्च, २०१६ पासून भारनियमन रद्द करण्यात आलेले आहे. परंतु आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये वीजेची मागणी व उपलब्धता यामध्ये तफावत निर्माण झाल्यास वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात येते. तसेच फक्त स्थानिक पातळीवर अचानक काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आवश्यकतेनुसार तात्पुरते भारनियमनाचे नियोजन करुन ग्राहकांना सुरळीतपणे विद्युत पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत राज्यात भारनियमन करण्यात येत नाही.

तसेच, पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी तसेच कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन शासन निर्णय व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत (जि.हिंगोली) येथील महावितरण कंपनीने मौ. जोडजवळा या गावामध्ये राजीव गांधी विद्युत वितरण योजनेतंर्गत केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(७) ९२१५६ (०९-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनी, वसमत कार्यालय (जि.हिंगोली) यांनी मौ.जोडजवळा या गावामध्ये राजीव गांधी विद्युत वितरण योजनेतंर्गत लाखो रुपये खर्च करुन नविन थ्री-फेझ जोडणीचे काम केले गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर कामामध्ये गैरव्यवहार झाल्याप्रकरणी तसेच मौ. जोडजवळा येथील सिंगल फेज लाईनचे काम तात्काळ करुन देण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात मा.मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री व कार्यकारी अभियंता हिंगोली यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणा-यांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर जोडणीचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) मौजे जोडजवळा या गावातील थ्री फेज जोडणीचे काम राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेत नसून गावठाण वाहीनी विलगीकरण योजना टप्पा-४ अंतर्गत करण्यात आले होते.

(२) हे खरे आहे

(३) सदरील गावठाण वाहीनीवरील ३ कि.मी. ११ के.व्ही उच्चदाब लाईन नैसर्गिक आपत्तीमुळे पडली होती. त्यामुळे कोणावरही दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३३/११ के.व्ही.उपकेंद्र हट्टा येथून निघणारे ११ केव्ही सातेफळ गावठाण फिडरवर जोडजवळा गाव जोडण्याकरिता ३ कि.मी.ची ११ केव्ही वाहिनी उभारणीचे काम सन २०११ मध्ये गावठाण वाहिनी विलगीकरण योजनेअंतर्गत पूर्ण केले होते.

सदरील गावठाण फिडरवरील ११ केव्ही ३ कि.मी. वाहिनी नैसर्गिक आपत्तीमुळे पडली होती. मौजे जोडजवळा गावात ३३ केव्ही सातेफळ उपकेंद्रातील ११ केव्ही एकुरखा कृषी फिडरवरुन विद्युत पुरवठा चालू होता.

तद्नंतर मौजे जोडजवळा या गावाजवळ असलेला पळशी उपकेंद्र केंद्रशासनाच्या दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत दिनांक २७.९.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आले असून सदर उपकेंद्रातून जोडजवळा गावाला वीज पुरवठा करण्यासाठी गावठाण वाहिनी कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशी व नेरुळ विभागातील ओ आणि एम योजनेअंतर्गत डीपीआर मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली कामे करण्याबाबत

(८) ९५१६२ (२९-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी व नेरुळ विभागातील ओ आणि एम योजनेअंतर्गत डीपीआर मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली कामे करण्यासाठी ७५.५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असली तरी कामे अद्याप सुरु करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय , चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार प्रत्यक्ष कामे कधी सुरु करण्यात येणार आहेत व कधी पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१), (२) व (३) वाशी व नेरुळ विभागातील नुतनीकरण व आधुनिकीकरण आर ॲण्ड एम (R & M) योजनेअंतर्गत उपकेंद्र उभारणी, उच्चदाब भूमिगत वाहिनी टाकणे, रिंग मेन युनिट बसविणे, फिडर पिलर उभारणे इ. कामांकरिता रुपये ५८.८९ कोटी इतक्या रक्कमेच्या कामास महावितरण कंपनीने दिनांक १२.१०.२०१८ रोजी मंजूरी दिली असून निविदा प्रक्रिया व पुढील कार्यवाही नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील नळपाणी पुरवठा योजनांकडे महावितरणची थकबाकी असल्याबाबत

(९) १०१०१९ (२९-१२-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील नळपाणी पुरवठा योजनांकडे महावितरणची सन २०१६ ते सन २०१७ या कालावधीतील वीजेची सुमारे २ हजार कोटींची थकबाकी असूनही महावितरणने अद्याप वसूलीसाठी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार वीज देयके वसूल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) व (२) राज्यातील नळ पाणी पुरवठा योजनांकडे माहे मार्च, २०१७ अखेर एकूण रक्कम रु.१४४८.६४ कोटी एवढी थकबाकी होती. थकबाकी न

भरणाऱ्या ग्राहकांवर महावितरण कंपनीमार्फत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. शहरी व ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा बिलांची थकबाकी भरण्यासंबंधी वित्त विभाग, नगरविकास विभाग, ग्रामविकास व जलसंधारण या विभागाशीसुध्दा वीज बिल भरणा करण्याबाबत पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या ग्राहकांसाठी थकीत वीज भरण्यासंबंधी थकबाकी १५ हप्त्यांमध्ये भरण्याकरीता सवलत देण्यात आली होती. या योजनांमध्ये एकूण १३७८ ग्राहकांनी सहभाग घेतला असून रु. १५.९२ कोटी एवढया रकमेचा भरणा केला आहे. शासनाने दिनांक १६.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शहरी व ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या दिनांक ३१.३.२०१८ अखेर असणारी मूळ थकबाकी पैकी ५०% रक्कम १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून नगर विकास विभाग व ग्रामविकास विभाग यांनी महावितरण कंपनीस अदा करावयाची आहे. व उर्वरित ५०% रक्कम संबंधित यंत्रणेने महावितरण कंपनीकडे भरावयाची आहे. त्यानुसार महावितरण कंपनीस मार्च, २०१९ अखेर रु.१४१.८९ कोटी शासनाकडूनउपलब्ध झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरणच्या पुणे परिमंडळाअंर्तगत असलेल्या कृषीपंप धारकांकडे थकबाकी असल्याबाबत

(१०) १०२२८० (२२-१२-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या पुणे परिमंडळाअंर्तगत असलेल्या हवेली, खेड,मावळ, जुन्नर, आंबेगाव, मुळशी तालुक्यात १३,३८४ कृषीपंपाना नवीन वीजजोडणी देण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मावळ, खेड २३४१, जुन्नर, आंबेगाव येथील ३१४८, मुळशी, हवेली येथील १९३० अशा एकूण ७ हजार ४१९ कृषीपंपधारक शेतकऱ्यांनी नवीन वीजजोडणी घेतल्यापासून वीज देयकच भरले नसल्याचे या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी पंपधारकाकडून थकबाकी वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१९) : (१) पुणे परिमंडळाअंतर्गत हवेली, खेड, मावळ, जुन्नर, आंबेगाव, मुळशी तालुक्यात माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ पर्यंत एकूण ३२९६ कृषीपंपाना व माहे एप्रिल, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ पर्यंत एकूण ८०३ कृषीपंपाना नवीन वीज जोडणी देण्यात आली आहे.

(२) या तालुक्यातील एकूण ७,१६० कृषीपंपाधारक शेतकऱ्यांनी नवीन वीज जोडणी घेतल्यापासून वीज देयक भरले नाही.

(३) पुणे परिमंडळाअंतर्गत थ्रकबाकी वसूलीसंदर्भात वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार व महावितरणच्या प्रचलित नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत असून कृषी संजीवनी योजनेअंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर एकूण २०,२१६ कृषी ग्राहकांनी कृषी संजीवनी योजनेचा लाभ घेतला असून रुपये १६.०३ कोटी इतकी रक्कम थकबाकीपोटी महावितरणकडे जमा झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जमाफीच्या रकमा लाभार्थ्यांच्या खाती जमा न केल्याबाबत

(११) १०४१२२ (१३-०७-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस केवळ ५८४ शेतकऱ्यांची यादी देऊन १ कोटी ९७ लाख २३ हजार रुपये उपलब्ध करून देऊन पडताळणी करूनच रक्कम अदा करावी अशा सूचना दिल्या असताना जिल्ह्यातील एकही शेतकऱ्याला कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफीचा लाभ न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुभाष देशमुख (०३-०५-२०१९) : (१) नाही.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदर रक्कम दि. २१.११.२०१७ रोजी संबंधीत शाखांना वर्ग करुन कर्जमाफीच्या रकमा लाभार्थ्यांच्या कर्जखाती जमा केल्या आहेत. तसेच दि. ०१.०४.२०१९ अखेर लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १,१४,५५४ खातेदारांना रु. १८४.३४ कोटीचा लाभ देण्यात आला.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ६.५ लक्ष ज्येष्ठ नागरीक असणाऱ्या महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरीक महासंघ (फेसकॉम) यांनी शासनाकडे २०१५ पासून आपल्या मागण्यांसाठी सतत निवेदने दिल्याबाबत

(१२) १०४२५९ (१३-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६.५ लक्ष ज्येष्ठ नागरीक असणाऱ्या महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरीक महासंघ (फेसकॉम) यांनी सन २०१५ पासून शासनाकडे आपल्या मागण्यांसाठी सतत निवेदने दिलेली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनातील मागण्यांमध्ये वयाची अट ६०+ करणे, श्रावणबाळ निवृत्ती वेतनात वाढ करणे, ज्येष्ठ नागरीक करिता स्वतंत्र मंत्री, स्वतंत्र आयुक्त, स्वतंत्र कक्ष असणे, तसेच शेतकरी शेतमजुर, ज्येष्ठ नागरीकांना दरमहा निवृत्ती वेतन असावे, या बाबीचाही समावेश असणे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१९) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्यातील निराधार व वृध्द व्यक्तीसाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येतात. विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना (दिव्यांग लाभार्थी वगळून) मासिक अर्थसहाय्य रु. ६००/- दरमहा देण्यात येते. तसेच दिनांक ३/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील ४० ते ७९ टक्के दिव्यांग व्यक्तींना दरमहा रु. ८००/- तर ८० टक्के व अधिक दिव्यांग व्यक्तींना दरमहा रु. १०००/- इतकी अनुदान वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे केंद्रशासनाच्या कायद्याप्रमाणे राज्यातील जेष्ठ नागरीकांसाठी वयाची अट ६५ वरून ६० करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यास मा.मंत्रीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल व इतर मागण्यांच्या संदर्भात मा.अमुसं (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असुन याबाबत सदर समिती निर्णय घेईल.

केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील जेष्ठ नागरीकांना विविध सवलती देण्यात याव्यात तसेच जेष्ठ नागरिकांच्या वय ६५ वरुन ६० करण्याबाबत

(१३) १०५३१९ (०४-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री सुरेश लाड(कर्जत),श्री पाडुरंग बरोरा(शहापूर), श्री.किसन कथोरे(मुरबाड), श्री हसन मुश्रीफ(कागल), श्री जंयत पाटील(इस्लामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा),

श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :

सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील जेष्ठ नागरीकांना विविध सवलती देण्यात याव्यात तसेच जेष्ठ नागरिकांचे वय ६५ वरुन ६० करण्यात यावे याबाबत दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेष्ठ नागरिकांसाठी अन्य राज्यात असलेल्या धोरणाचा अभ्यास करुन सर्व समावेशक धोरण शासनाने ठरवून उक्त निर्णय घेतला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेष्ठ नागरिकांना कोणकोणत्या सवलती व सुविधा देण्यात येणार आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१९) : (१) व (२) केंद्र शासनाच्या कायद्याप्रमाणे राज्यातील ज्येष्ठ नागरीकांसाठी वयाची अट ६५ वरून ६० करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यास मा.मंत्रीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) राज्याचे सर्वसमावेशक धोरणाची अंमलबजावणीबाबत दि. ०९/०७/२०१८ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये ज्येष्ठ नागरीकांचे वय ६५ वरून ६० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त अशी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये मुख्यत: ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक नियोजन करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे व त्यांना ताणतणावास तोंड देण्यासाठी सक्षम करणे या बाबींचा समावेश आहे.

कोल्हापूर जिल्हयातील कोवाड किनी, कुदनूर, निट्टूर किणी व कागणी या परिसरात ऊसाचे पिक जळित झाल्याबाबत

(१४) १०७२०२ (०४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील कोवाड किनी, कुदनूर, निट्टूर किणी व कागणी या परिसरात माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वा त्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे ऊसाच्या फडाला आग लागून सुमारे ५२ एकरातील ऊस जळून नष्ट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील विजेचे वाकलेले खांब व लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्यांवर विभागाने वेळीच उपाययोजना केली नसल्याने सदर घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर,२०१७ च्या पहिल्या सप्ताहात मा.उर्जा मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, आगीमुळे किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व वेळीच उपाययोजना न करणा-या विभागाच्या संबधित कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे. विद्युत निरिक्षक, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार कोल्हापूर जिल्हयातील कोवाड, निट्टर, कुदनूर व कागणी या परिसरात माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ या कालावधीत विविध कारणामुळे अंदाजे ३७ एकर ऊस पिक जळीत झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.अभिलेख्यात निवेदन अप्राप्त आहे.

(४) उपरोक्त सर्व अपघातांची चौकशी विद्युत निरीक्षक, कोल्हापूर यांच्यामार्फत करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानुसार विजेच्या तारांचा एकमेकांशी स्पर्श झाल्यामुळे ठिणग्या उडून ऊस व गवत जळीताच्या घटना घडल्याचे नमूद केले आहे. आगीमुळे एकूण ६७ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याविषयी महावितरण कंपनीमार्फत पत्रांद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच झुकलेले विजेचे खांब सरळ करणे व लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्या पूर्ववत सुस्थितीत करण्याचे काम नियमितपणे सुरु आहे. सदर अपघाताबाबत संबंधित उपकार्यकारी अभियंता, चंदगड यांना खुलासा सादर करण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील टेक्सटाईल पार्कसाठी घाटपुरी शिवारातील जमीन संपादित करण्याबाबत

(१५) १०७६९१ (१९-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील टेक्सटाईल पार्कसाठी घाटपुरी शिवारातील १०० एकर जमिन संपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगाव टेक्सटाईल पार्कसाठी घाटपुरी येथील संपादित जागेवर विकास कामे करण्याबाबत संबंधितांना मा.मुख्यमंत्री यांनी निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टेक्सटाईल पार्क प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण होऊन बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२७-०८-२०१८) : (१) नाही.

सद्यस्थिती जमीन हस्तांतरण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.

जमीन हस्तांतरण केल्यानंतर सदर जागेवर विकास कामे करण्यात येतील.

(३) वरील १ व २ नुसार कार्यवाही झाल्यानंतर बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत शासन नियमानुसार कार्यवाही करेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आश्रमशाळा व वसतिगृहावर होणारा खर्च हा ८ टक्के व १२ टक्के असून तो आजही पाचव्या वेतन आयोगावरील वेतनावरच सुरु असल्याबाबत

(१६) १०९११५ (०४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळा व वसतिगृहावर होणारा खर्च हा एकूण खर्चाच्या ८ टक्के व १२ टक्के असून तो आजही पाचव्या वेतन आयोगावरील वेतनावरच सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदरील खर्च हा सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे द्यावा अन्यथा प्रत्यक्ष होणारा (उदा. एकूण होणारा खर्च - ३,५०,०००/- आणि शासन अनुदान- ३५,०००/- म्हणजेच होणा-या खर्चाच्या १० टक्के रक्कम शासन करत असल्याने) खर्च देण्यात यावा, अशी मागणी येथील शाळा व वसतिगृह व्यवस्थापनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णू सवरा (०६-०६-२०१९) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अनुदानित आश्रमशाळांना आकस्मिक खर्चासाठी अनुदान कर्मचाऱ्यांच्या वेतनावर आधारीत दिले जात असल्याने प्रती विद्यार्थी या अनुदानामध्ये तफावत आढळून येत असल्याने हे अनुदान विद्यार्थी संख्येवर आधारीत देण्या बाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात प्रकल्प उभारण्याच्या खर्चापोटी स्थिर आकार म्हणून राज्यातील वीज ग्राहकांवर वीजेचा आर्थिक भार येत असल्याबाबत

(१७) १०९२३४ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रकल्प उभारण्याच्या खर्चापोटी स्थिर आकार म्हणून राज्यातील वीज ग्राहकांवर सुमारे ३८०० कोटी रुपये इतक्या महागडया वीजेचा आर्थिक भार येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनास महागडया दराने वीज खरेदी करावी लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, बंद वीज प्रकल्प सुरु करणेबाबत आणि वीज ग्राहकांवर आर्थिक भार पडू नये याबाबत राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१), (२) व (३) महावितरणने भविष्यातील वीज मागणीतील वाढ विचारात घेऊन २०२५ पर्यंतची वीजेची मागणी लक्षात घेता, विविध दिर्घकालीन वीज खरेदी करार केलेले आहेत. महावितरण कंपनी तर्फे महाजनको, एनटीपीसी, एनपीसीआयएल, यांचे सोबत सामंजस्य कराराद्वारे व स्वतंत्र वीज प्रकल्प यांचे सोबत उर्जा मंत्रालय (MoP), भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार पारदर्शक निविदेद्वारे (केस-(१) असे एकूण ३५०९९ मे.वॅ. चे दिघकालीन वीज खरेदी करार करण्यात आले आहेत.

वीज खरेदी करारातल्या तरतुदीनुसार व मा.वीज नियामक आयोगाने मंजुर केल्यानुसार करारीत क्षमतेच्या निर्मिती संचांना स्थिर आकार देणे बंधनकारक आहे. राज्यातील विजेची मागणी भागविण्याकरिता वीज निर्मिती संच हे वीज मागणीच्या प्रमाणात मा. वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या मेरीट ऑर्डर डिसपॅच (MoD) तत्वानुसार चालविले अथवा बंद केले जातात. त्यामुळे महागडया विजेचा भुर्दंड पडत असल्याचे म्हणणे संयुक्तिक नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्यातील ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत फिर्यादींना देण्यात येणारा अनुदान बंद असल्याबाबत

(१८) ११००९० (२३-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत फिर्यादींना देण्यात येणारा अनुदान गत तीन महिन्यापासून बंद असल्याने अनुदान मिळण्याच्या अनुषंगाने फिर्यादीच्या प्राप्त तक्रारीवरून ॲट्रोसिटी कायद्यांतर्गत अनुदान देण्यात यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१९) : (१) होय.
(२) व (३) अनु.जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ अंतर्गत पिडीत व्यक्तींना देण्यात येणारे अर्थसहाय्य योजना ही केंद्र/राज्य ५०-५०% या प्रमाणात राज्यात राबविण्यात येते. केंद्राचा ५०% हिस्सा प्राप्त झाल्यानंतर राज्याचा ५०% हिस्सा देण्यात येतो. परिणामी तरतूदी अभावी देयके प्रलंबित होती. तरतूद प्राप्त झाल्यानंतर सन २०१७-१८ अखेर ३० लाभार्थ्यांना रू.५४.२७ लाख एवढे अनुदान वाटप करण्यात येऊन तदनंतर दि. २३/०२/२०१८ रोजी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, भंडारा मार्फत संबंधीतांच्या बँक खात्यावर रकमा जमा करण्यात आले. सदर योजना सुरू आहे.

नांदगांव (जि.नाशिक) मतदार संघातील वस्ती व वाड्यांवर सिंगल फेज योजना राबविण्याबाबत

(१९) ११८२३६ (२६-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील नांदगांव मतदार संघातील वस्ती व वाड्यांवर सिंगल फेज योजना राबविण्याबाबतची मागणी नांदगांव मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी व त्यासुमारास मा. उर्जामंत्री व मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. परिमंडळ कार्यालय नाशिक रोड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने मनमाड विभागातील सिंगल फेज योजना राबविण्यासाठी नमूद केलेल्या वस्त्यांपैकी चावडी वस्ती व मल्हार वस्ती यांच्या कामांची प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन सन २०१७-१८ च्या डी.पी.डी.सी. योजनेत वाढीव निधी तरतुदीअंतर्गत समावेश करण्यात आलेला असून एप्रिल, २०१८ मध्ये निधी प्राप्त झालेला आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर आहे.

टाकळी बु. येथील आश्रमशाळा वस्ती, जातेगाव येथील पिनाकेश्वर महादेव मंदिर आदिवासी वस्ती (पिनाकेश्वरवस्ती), वेशवस्ती, नवेगांव (यशवंत नगर), गोंदेगाव रस्तावस्ती, लोढरे येथील तांडावस्ती, वडाळी बु. येथील डफाळ वस्ती, ढेकू येथील आश्रमशाळा तांडावस्ती, सूर्यवंशीवस्ती, बोराळे येथील डोक वस्ती येथे रोहित्रे देणे तसेच मनमाड येथील कारंडेवस्ती यांचा समावेश सन २०१८-१९ च्या डी.पी.डी.सी. योजनेअंतर्गत करण्यात आला आहे.

भारडी नवसारी येथील मागासवर्गीय वस्ती, धोटाने बु. येथील गायकवाड वस्ती यांचे विद्युतीकरण सौभाग्य योजनेत पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच माळेगांव (क) येथे SDT (Special Designed Transformer) प्रस्तावित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिन्नर तालुक्यातील (जि.नाशिक) येथील सेझ प्रकल्प बंद अवस्थेत असल्याबाबत

(२०) १२२४९६ (२८-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील सिन्नर येथे सेझ प्रकल्पातंर्गत १३५० मेगावॉट वीज निर्मितीचे संच असतांना प्रकल्पाकडून तयार करण्यात आलेल्या वीज खरेदीचा करार राज्य शासनाने न केल्याने सेझचे कामकाज बंद झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेझ अंतर्गत सिन्नर तालुक्यातील,जि.नाशिक या प्रकल्पाची १३५० मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता असतांनाही सन २०१४ पासून राज्य शासनाने खरेदी करार न केल्याने प्रकल्पाची आर्थिक थकबाकी वाढत गेल्याने थकबाकीदार ठरलेला हा प्रकल्प एनपीएमध्ये जाऊन वीजनिर्मिती प्रकल्पांचे नियमन करणा-या पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने माहे एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रकल्पाचा ताबा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने १३५० मेगावॉट वीज प्रकल्प सुरु करण्याबाबत व नाशिक जिल्हयातील सेझ प्रकल्पांतील उद्योग वाढीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा केल्या जाणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१), (२) व (३) नाशिक जिल्हयातील सिन्नर येथील मे.रतनइंडिया यांच्याबरोबर १३५० मे.वॅ. पैकी ६५० मे.वॅ.चा वीज खरेदीकरिता महावितरण कंपनीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर दिनांक २७.१२.२०१२ रोजी निकाल पारित करण्यात आला. या निकाला विरुध्द इतर निविदाकार यांनी ॲपटेल व मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. दरम्यान महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने अपिलीय प्राधिकरणाच्या आदेशानुसार दिनांक १९.०१.२०१९ रोजी आदेश पारित केला. त्यानुसार मे.रतन इंडिया यांनी ५०७ मे.वॅ. वीज रु.३.२८ प्रति युनिट या दराने महावितरण कंपनीस द्यावयाची आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालय, यासह अन्य प्रशासकीय इमारतीवरील सौरऊर्जा पॅनेल नादुरुस्त असल्याबाबत

(२१) १२३४५३ (२८-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा क्रिडांगण, वसतीगृह यासह अन्य प्रशासकीय इमारतीवरील सौरऊर्जा पॅनेल नादुरुस्त असूनही त्याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे मे, २१०८ च्या दरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील पारंपारिक स्तोत्र असलेल्या सौर ऊर्जेचे पॅनेल दुरुस्त करुन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०५-२०१९) : (१) वाशिम जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालयांवरील सौरऊर्जा सयंत्राला आग लागल्यामुळे, जिल्हा क्रिडांगण व जिल्हा कोषागार कार्यालय येथील सौरऊर्जा सयंत्राच्या बॅटरीचा कार्यकाळ संपल्यामुळे व जिल्हा कोषागार कार्यालय, वाशिम येथील सौरऊर्जा सयंत्र तसेच शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृह, आश्रमशाळा यावरील सोलर वॉटर हिटरचे पॅनल नादुरुस्त असल्याचे आढळले आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, वाशिम यांना सौर संयंत्रे दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रके महाऊर्जा मार्फत तयार करून देण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयावरील सौरऊर्जा पॅनल दुरुस्तीची निविदा दिनांक १८/०५/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने फेर निविदा काढण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून सुरु आहे.

जिल्हा क्रिडांगण कार्यालयावरील सौरऊर्जा सयंत्र दुरुस्तीचे अंदाजपत्रक, आराखडा व तांत्रिक मान्यता महाऊर्जा कडून प्राप्त झाले असून सौरऊर्जा सयंत्राच्या दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.

शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृह व आश्रमशाळा यावरील सोलर वॉटर हिटरचे पॅनल दुरुस्तीबाबत तांत्रिक दुरुस्ती करुन ते ६ महिन्यात सुरु करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, वाशिम यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांना दिले आहेत.

मेळघाट (जि.अमरावती) येथील म्हसोना आश्रमशाळेतील
विद्यार्थीनीचा झालेला मृत्यु

(२२) १२३९२३ (२७-०७-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील म्हसोना आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा जळून मृत्यू झाला असून या घटनेच्या चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली असल्याची बाब दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनूसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णू सवरा (१७-०५-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर मृत्युची चौकशी करण्यासाठी प्रकल्प अधिकारी, धारणी यांनी तहसीलदार, तालुका वैद्यकीय अधिकारी व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांची चौकशी समिती नियुक्त केली होती.

चौकशी समितीच्या अहवालानुसार कु.गौरी मनाजी भुसुम ही इयत्ता ३ री मध्ये शिकत असलेली विद्यार्थीनी दिनांक ११.०१.२०१८ रोजी शेकोटीजवळ बसून पेनाच्या कांडीला जाळून त्यापासून फुगा तयार करत होती. त्यादरम्यान आगीची ठिणगी तिच्या फ्रॉकवर पडून ती भाजली. सदर विद्यार्थीनीला तात्काळ जिल्हा रुग्णालय, अमरावती व त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे उपचार करण्यात आले. तथापि, वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे उपचारादरम्यान दिनांक २०.०१.२०१८ रोजी तीचा मृत्यु झालेला आहे. सदर विद्यार्थीनीवर तात्काळ वैद्यकीय उपचार करण्यात आले असून संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे काळाधोंड (ता.उरण, जि.रायगड) येथे अनधिकृत घरांमध्ये
बेकायदेशीर वीजवापर सुरु असल्याबाबत

(२३) १२४६९५ (२८-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काळाधोंड (ता.उरण, जि.रायगड) येथे अनधिकृत घरांमध्ये बेकादेशीर वीजवापर सुरु असल्याची तक्रार तेथील नागरिकांनी तत्कालीन ऊर्जामंत्री यांचेकडे दिनांक २३ सप्टेंबर, २००३ पासून केली जात असून तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई न करता तक्रारदारांवरच कारवाई करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे कार्यालयाकडून प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांना पत्राव्दारे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी पत्राव्दारे कारवाई करण्याबाबत कळवूनही अद्याप कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे कार्यालयाकडून प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांना दिनांक ३.२.२०१८ च्या पत्रान्वये कारवाई करण्याबाबत कळविल्याच्या अनुषंगाने महावितरणद्वारे सदर प्रकरणी स्थळ तपासणी करण्यात आली आहे.
(४) श्री.शशिकांत पाटील यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीतर्फे स्थळ तपासणी केली असता असे आढळून आले की घर क्र.९२०/अ, उरण कोट, काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड या ठिकाणी बऱ्याच वर्षांपासून कोणीही राहत नाही. सदर घरात वीज जोडणी नसलेले सिंगल फेज मीटर आढळून आलेले असून सदर मीटर हे श्री.शशिकांत पाटील यांच्या नावे आहे. सदर वीज पुरवठा हा सुमारे १० वषापूर्वी दिनांक २३.०१.२००८ रोजी कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेला आहे. या वीज जोडणी मीटरला महावितरणच्या लघुदाब वाहिनीपासून सर्व्हिस वायरद्वारे जोडणी आढळून आली नाही. सबब या उपरोक्त जागेमध्ये अवैध/ बेकायदेशीर वीज वापर होत असल्याचे निदर्शनास आले नाही. सबब, संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील कृषि पंपाना नियमित व वेळेवर वीजपुरवठा करण्याबाबत

(२४) १२८१८२ (०४-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात माहे सप्टेंबर,२०१८ च्या सुरुवातीपासूनच पाऊस कमी झाला असून त्यातच अपु-या वीज पुरवठयामुळे सिंचनाची सोय होत नसल्यामुळे पिके करपू लागली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच कृषि पंपाना नियमित व वेळेवर वीजपुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी तसेच कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन शासन निर्णय व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येते.
(३) माहे सप्टेंबर, २०१८ महिन्याच्या सुरुवातीपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे सप्टेंबर, २०१८ महिन्यातील विजेची उच्चतम मागणी २०३३० मे.वॅ. इतकी वाढली होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत (सप्टेंबर २०१७) सुमारे २०% जास्त होती. तसेच माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वीजेची उच्चतम मागणी २१६०७ मे.वॅ. इतकी नोंदवली गेली आहे. तसेच कोळशाच्या उपलब्धतेत आलेल्या तुटवड्यामुळे महावितरणद्वारे वीजेची उपलब्धता वाढविण्यासाठी लघुकालीन निविदेद्वारे, माहे ऑक्टोबर मध्ये १००० मे.वॅ., माहे नोव्हेंबर मध्ये ५०० मे.वॅ. एवढी वीज खरेदी केली व दररोज पॉवर एक्सचेंज मधून गरजेनुसार वीज खरेदी करुन वीजेची उपलब्धता वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोणार तालुक्यात (जि.बुलढाणा) येथील वीज वितरण कंपनीच्या वतीने करण्यात आलेल्या निकृष्ट कामाबाबत

(२५) १२८८७७ (०६-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार तालुक्यात (जि.बुलढाणा) व परिसरामध्ये वीज वितरण कंपनीच्या वतीने करण्यात आलेल्या निकृष्ट कामांची व एजन्सीची चौकशी करुन अधिकारी व कंत्राटदारांवर तात्काळ कारवाई करण्याच्या मागणीसाठी दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास महावितरण कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
उपोषणकर्ता यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता खामगांव विभाग यांनी दिनांक ०५.०९.२०१८ रोजी दोन सदस्यीय चौकशी समिती गठीत केली असून सदर समितीने निवेदनामध्ये नमूद मौजे सुलतानपूर ते पिंप्री खंदारे या ३३ के.व्ही. विद्युत वाहिनीची, मौजे कळपविहीर येथील धरणावर जाणाऱ्या ११ के.व्ही.कृषी विद्युत वाहिनीची देखभाल व दुरुस्ती अंतर्गत झालेल्या काही कामांची पाहणी केली. तद्नंतर सदरहू समितीने

दिनांक १२.०९.२०१८ रोजी चौकशी अहवाल सादर केला. त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, खामगांव विभाग यांनी दिनांक २१.०९.२०१८ रोजी संबंधित उपोषणकर्ता यांना त्यांचे निवेदनाच्या अनुषंगाने माहिती सादर केली. सदर उपोषणकर्ता यांनी महावितरणने केलेल्या कारवाई समाधान झाल्याबाबतचे लेखी पत्र दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अल्लापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) शेतकऱ्यांना दोन वर्षे कोटेशन भरुनही कृषी पंपाना अदयाप वीजजोडणी देण्यात आलेली नसल्याबाबत

(२६) १२९००४ (०६-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील अल्लापूरमधील चार शेतकरी व तालुक्यातील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक शेतक-यांनी दोन वर्षे कोटेशन भरुनही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांच्या कृषी पंपाना अदयाप वीजजोडणी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक तक्रारी असतानाही येथे एकाच कंत्राटदाराला वीज पुरवठा देण्याचे कंत्राट देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार येथील शेतक-यांच्या कृषीपंपाना तातडीने वीजजोडण्या देण्यासोबतच यासंदर्भात दिरंगाई करणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणमार्फत वीज पुरवठा देण्याकरिता उपविभागनिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येते व त्यामध्ये सर्वात कमी दर असणाऱ्या कंत्राटदारास कामे देण्यात येतात.

(३) नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना तातडीने वीज जोडण्या देण्याकरिता विशेष पॅकेज योजना-१, विशेष पॅकेज योजना-२, पायाभूत आराखडा योजना आणि जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मागील ५ वर्षात (सन २०१३-१४ ते २०१७-१८) एकूण २०,६२४ कृषी पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी उच्चदाब वीज वितरण प्रणाली योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ६७०६ कृषीपंप ग्राहकांना वीजजोडणी देण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जावळी (जि.सातारा) तालुक्यात महावितरण कंपनीच्या गैरकारभाराबाबत

(२७) १२९४४९ (०५-१२-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यात लोडशेडिंग असूनही वीजबिल रिडींग घेणारे शासनाचे खासगी कर्मचारी हे रीडिंग न घेताच अंदाजे वीज बील काढत असल्यामुळे ग्राहकांना मोठा आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे अनेक शेतकरी व ग्राहकांनी वीजपंप,घरगुती मीटर कनेक्शनसाठी अनामत रक्कम भरुनही अद्याप त्यांना मीटर देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन वीज ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी वीज जोडण्या देण्यासह येथील कर्मचा-यांच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. माहे नोव्हेंबर, २०१८ अखेर जावळी तालुक्यातील एकूण १९७ घरगुती ग्राहक व ४०० शेतीपंप ग्राहक पैस भरुनही प्रलंबित आहेत.

(३) माहे मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या शेतीपंप वीज जोडण्या देण्यासाठी उच्चदाब वितरण प्रणाली योजना अंशीक टर्नकी व पूर्ण टर्नकी तत्वावर राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जावळी तालुक्यातील माहे मार्च, २०१८ अखेर एकूण शेतीपंप वीज जोडण्या देण्यासाठी कार्यादेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कौलखेड (जि.अकोला) येथील वीज उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करणे व कर्मचा-यांची पदे वाढविण्याबाबत

(२८) १२९७७५ (०५-१२-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौलखेड (जि.अकोला) येथे पावसाळयात वारंवार वीज सेवा खंडीत होत असून याचा त्रास परिसरातील १४ हजार वीज ग्राहकांना होत असल्याने उक्त प्रकरणी लोकप्रतिनीधी यांनी चौकशी केली असता १४ हजार ग्राहकांसाठी कर्मचा-यांची संख्या केवळ १० ते १२ असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौलखेडा येथील वीज उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करणे व कर्मचा-यांची पदे वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) कौलखेड (जि. अकोला) येथील नवीन ३३/११ के.व्ही उपकेंद्र दिनांक १५.०९.२०१८ ला कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तसेच कौलखेड परिसरातील तक्रार निवारण केंद्र क्र. १३ येथील तक्रार निवारण व विद्युत वाहिनीवर येणारे दोष, रोहित्र देखभालकरिता तांत्रिक कर्मचाऱ्यांची एकूण १५ पदे मंजूर असून १००० ग्राहकांकरिता एक अशी एकूण १४ कर्मचारी कार्यरत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरणची पाण्यासह रस्त्यावरील दिव्याची वीज देयके
शासकीय प्राधिकरणांनी थकविल्याबाबत

(२९) १३०६५६ (०७-१२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रस्त्यावरील दिव्यांसह पाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विजेच्या बिलांची रक्कम विविध महापालिकांसह राज्य सरकारच्या विविध प्राधिकरणांकडून थकविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकबाकी माहे एप्रिल, २०१८ पासूनची असून थकबाकीच्या रकमेचा आकडा १ हजार ४६ कोटी एवढा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू वीजबिले स्थानिक प्राधिकरणांकडून थकविण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यातील विविध महापालिकासह विविध शासकीय प्राधिकरणाकडून महावितरणला देय असलेली थकबाकीची रक्कम विनाविलंब अदा होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) रस्त्यावरील पथदिव्यांसह पाणीपुरवठ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वीज बिलांची थकीत रक्कम माहे एप्रिल, २०१८ अखेर रु.५१५३ कोटी आहे. व माहे ऑगस्ट, २०१८ अखेर एकूण रु. ५६०३ कोटी आहे.
(३) महावितरणतर्फे शासनाच्या विविध प्राधिकरणांतर्गत वीजबिल थकीत ग्राहकांना वीज अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार वीज पुरवठा खंडीत करण्याबात नोटीस देऊन वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करण्यात येते व स्थानिक स्तरावर महावितरणतर्फे वेळोवेळी थकबाकी भरण्याबाबत सदर प्राधिकरणांकडे पाठपुरवठा करण्यात येतो. तथापि, प्राधिकरण ग्राहकांतर्फे उपलब्ध निधीनुसार वीज बिल भरणा केला जातो.

(४) शासन निर्णय दिनांक १६.०५.२०१८ अन्वये नगरविकास/ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या वीजदेयकांच्या माहे मार्च, २०१८ अखेरीस मूळ थकबाकीच्या ५० टक्के रक्कम महावितरण कंपनीस अदा करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. मूळ थकबाकीच्या ५० टक्के उर्वरित रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांनी भरावयाची आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सादळे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील विद्युत खांब अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याबाबत

(३०) १३०६५९ (०६-१२-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील करवीर तालुक्यामधील सादळे येथील निखिल पाटील यांच्या घरासमोर असलेला विद्युत खांब अत्यंत धोकादायक स्थितीत असून यामधून ११००० व्होल्टचा विद्युत प्रवाह सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिकांनी वारंवार महावितरणकडे तक्रारी करुनही कोणतीच कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१९) : (१) हे खरे नाही. कोल्हापूर जिल्हयातील करवीर तालुक्यातील सादळे येथील निखील पाटील यांच्या घरासमोर असलेला विद्युत खांब ११००० व्होल्टचा नसून लघुदाब विद्युत वाहिनीचा (४४० व्होल्टचा) होता.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये सदर खांब बदलण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बिद्री (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील स्टेशनरी दुकानाला लागलेली आग

(३१) १३११६८ (०६-१२-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिद्री (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील श्री.यशवंत श्रीपती नाटले यांच्या स्टेशनरी दुकानास एमएसईबीचे शॉर्टसर्कीट होऊन लागलेल्या आगीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याने नुकसान भरपाई मिळावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार श्री.नाटले यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास त्याची सद्यस्थिती काय आहे व नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, कोल्हापूर कार्यालयामार्फत दिनांक १४.३.२०१८ रोजी करण्यात आली आहे. विद्युत निरीक्षक, कोल्हापूर यांनी सदर घ्रटनास्थळी लागलेली आग "सबळ पुराव्याअभावी विद्युत कारणामुळे लागली असल्याचे निश्चित करता येत नाही" असे अभिप्राय दिले आहेत. त्यामुळे आग ही विद्युत कारणामुळे लागल्याचे निष्पन्न न झाल्यामुळे सदर बाबतीत महावितरण कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विद्युतवाहक तारातील दोषांमुळे पालघर जिल्ह्यात माणसांचे व गुरांचे मृत्यू झाल्याबाबत

(३२) १३१६७६ (०६-१२-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात विद्युतवाहक तारातील काही दोषांमुळे माहे जानेवारी, २०१८ पासून ते माहे सप्टेंबर, २०१८ अखेरपर्यंत विजेच्या धक्क्यामुळे किंवा तारा तुटून विजेचा प्रवाह जमिनीत पसरल्यामुळे अनेक माणसे व गुरे मृत्यूमुखी पडली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व असल्यास तिचा निष्कर्ष काय आहे,
(३) असल्यास, या घटनांमुळे किती जिवित हानी झाली आहे व मृतांच्या वारसांना तसेच गुरांच्या मालकांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) पालघर जिल्ह्यात जानेवारी, २०१८ ते सप्टेंबर, २०१८ अखेरपर्यंत विद्युत प्राणांतिक अपघातामध्ये १६ गुरे मृत्यूमुखी पडली आहेत. सदर अपघातांमध्ये मनुष्यहानी झालेली नाही.

(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग क्र.१, ठाणे या कार्यालयामार्फत करण्यात आली असून, वीजवाहक तारा तुटल्यामुळे १३ अपघात, पोलची स्टे वायर विद्युत भारीत झाल्यामुळे १ अपघात व वीज वाहिनीचा खांब विद्युत भारीत झाल्यामुळे २ अपघात झालेले आहेत.

(३) सदर अपघातांपैकी २ घोडे यांच्या प्राणांतिक अपघाताची नुकसान भरपाई रक्कम रु.५०,०००/- दिनांक १५.११.२०१८ रोजी देण्यात आली आहे व १ बैल यांच्या प्राणांतिक अपघाताची नुकसान भरपाई रक्कम रु.३०,०००/- दिनांक २६.०२.२०१९ रोजी महावितरण कंपनीमार्फत देण्यात आली आहे. तसेच उर्वरित जनावरांच्या मालकांकडून नुकसान भरपाई देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धनकवडी (जि.पुणे) येथील मुंगळेअण्णा नगर येथील सर्व्हे नं.३१ मध्ये धोकादायक रोहित्रामुळे अपघात सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

(३३) १३१८५३ (०७-१२-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनकवडी (जि.पुणे) येथील मुंगळेअण्णा नगर येथील सर्व्हे नं.३१ मध्ये गणेशप्रसाद सोसायटीच्या परिसरातील धोकादायक रोहित्रामुळे अपघात होण्याची शक्यता असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रोहित्राला दरवाजा व कंपाऊंड नसल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली असून याबाबत तक्रारी केल्या असतानाही अद्यापही महावितरण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आहे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भागात महावितरणचे डीपी, ट्रान्सफार्मर, विद्युत तारा अतिशय धोकादायक स्थितीत असून याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) धनकवडी (पुणे) येथील मुंगळेअण्णा नगर येथील सर्व्हे नं.३१ गणेशप्रसाद सोसायटीच्या परिसरातील रोहित्राचे कुंपण व सिक्स वे फिडर पिलरच्या झाकणाचे दार तुटलेल्या अवस्थेत आढळले होते.

(२) हे खरे नाही.

सदर रोहित्राच्या कुंपणाच्या दुरुस्तीचे व फिडर पिलरच्या झाकणाचे काम दिनांक २७.१०.२०१८ रोजी पूर्ण करुन त्याला सुरक्षित करण्यात आले आहे.

(३) धनकवडी परिसरातील उक्त भागात सुरक्षिततेच्या दृष्टीने महावितरणच्या देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत एकूण ७ रोहित्रांना नवीन कुंपणे करण्यात आली आहेत, ३८ फिडर पिलर दुरुस्त केले आहेत, ३५ नवीन फिडर पिलर बसविण्यात आले आहेत, ३४० मीटरच्या नवीन भूमिगत वीज वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, ६३० मीटरच्या भूमिगत वाहिन्यांच्या क्षमतेत वाढ करण्यात आली आहे, तसेच १२८ रोहित्रांची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिंचगड (ता.देवरी, जि.गोंदिया) येथे महावितण कंपनीच्या अपु-या कर्मचा-यामुळे विद्युत सेवा प्रलंबित असल्याबाबत

(३४) १३१८९४ (०६-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचगड (ता.देवरी, जि.गोंदिया) येथे महावितरण कंपनी कार्यालयाची स्थापना करण्यात आली असून या कार्यक्षेत्रात जवळपास २६ गावे वाड्या व वस्त्या असून येथे महावितरण कंपनीच्या गैरकारभारामुळे व अपु-या कर्मचा-यांमुळे विद्युत सेवा पुरविण्यात येत नसल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व तेथील नागरिकांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांची नियुक्ती करून गावात विजेची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) चिंचगड वितरण केंद्रामध्ये एकूण १६ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी १४ पदांवर पूर्वी पासून कर्मचारी कार्यरत असून त्यांच्याकडून बिघाड झालेल्या वाहीन्याची दुरुस्ती करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आरमोरी (जि.गोंदिया) तालुक्यातील वडधा परिसरातील शेतक-यांनी धान पिकाच्या उत्पादनासाठी कृषिपंपाना वीज पुरवठा करण्याबाबत

(३५) १३१८९६ (०६-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गोंदिया) तालुक्यातील वडधा परिसरातील शेतक-यांनी धान पिकाच्या उत्पादनासाठी शेतातील विहीरीवर कृषिपंप लावलेले असून गेल्या १५ दिवसांपासून महावितरणाच्या कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे कृषिपंप जळाले असल्याने कृषिपंपाना सुरळीत वीज पुरवठा करण्याबाबत महावितरण विभागाकडे त्यांनी मागणी केली असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शेतक-यांच्या कृषिपंपाना वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) आरमोरी तालुक्यातील वडधा परिसरातील शेतकऱ्यांनी धान पिकाच्या उत्पादनासाठी शेतातील विहीरीवर लावलेले कृषीपंप कमी दाबाच्या वीज पुरवठयामुळे जळालेले असल्याची कोणतीही तक्रार महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे महावितरणचे विभागीय कार्यालयाच्या निर्मितीबाबत

(३६) १३२२४६ (०७-१२-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे महावितरणच्या विभागीय कार्यालयाच्या निर्मितीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१८ रोजी मा.उर्जा मंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यःस्थितीत बार्शी विभागीय कार्यालय व नियोजित जेऊर विभागीय कार्यालयास आवश्यक असणारी वीज ग्राहक संख्या पूर्ण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, करमाळा तालुक्यात शेवटी असणा-या गावांचे अंतर विभागीय कार्यालयाशी सुमारे १५० किमीचे असल्याने ग्रामस्थ, शेतकरी, व्यावसायिक व महावितरणचे कर्मचारी यांची विविध कामकाजासाठी ये-जा करण्यास गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीच्या मानंकातील तरतुदीनुसार विभागीय कार्यालय निर्मितीकरीता १,२०,००० व विभाजनाकरिता २,४०,००० वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत बार्शी विभागाची ग्राहक संख्या २,३२,७७३ आहे. विभाजनानंतर बार्शी विभागाची ग्राहक संख्या १,११,४३५ राहील व प्रस्तावित जेऊर विभागाची ग्राहक संख्या १,२१,३३८ एवढी राहील. विभाजनानंतर प्रस्तावित जेऊर विभाग मंजूर ग्राहक संख्येचे निकष पूर्ण करत असले तरी विद्यमान बार्शी विभाग संख्येचा निकष पूर्ण करत नसल्यामुळे बार्शी विभागाचे विभाजन सद्यस्थितीत करता येणार नाही.

(३) हे खरे आहे.

(४) कंपनीचे नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ग्राहक मानके पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु केली आहे. नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ग्राहक मानंके प्रसृत केल्यानंतर सदर प्रस्तावासंदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उमरी (जि. नांदेड) तालुक्यातील महावितरण कंपनीचे ४२ डिपी बंद असल्याबाबत

(३७) १३२५०९ (०६-१२-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील महावितरण कंपनीचे ४२ डिपी गेल्या ६ महिन्यांपासून बंद पडल्याने ग्रामीण भागातील जनतेला वीजेच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नादुरुस्त डीपीची दुरुस्ती करण्यासाठी उमरी तालुक्यात सध्या कोणतीही एजन्सी कार्यरत नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, यामुळे तातडीने या नादुरुस्त डीपीची दुरुस्ती करण्यासोबतच येथे याकामी एजन्सी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

उमरी तालुक्यातील दिनांक ०१.०४.२०१८ ते १५.१२.२०१८ या कालावधीत एकूण ६९ रोहित्रे नादुरुस्त झाली होती. ही सर्व रोहित्रे बदलण्यात आली आहेत.

(२) हे खरे आहे. उमरी तालुक्यातील नादुरुस्त डीपी इतर ठिकाणी नेमून दिलेल्या एजन्सीमार्फत दुरुस्त करण्यात येतात.

(३) महावितरण कंपनीने सद्यस्थितीत एमआयडीसी,नांदेड व वाकद, ता.भोकर येथील एजन्सीमार्फत रोहित्र दुरुस्त करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

करमाळा (जि.सोलापूर) ग्रामीण भागातील वीज खांब व विद्युत वाहिन्या कमकुवत व जीर्ण झाल्याबाबत

(३८) १३२५७६ (०६-१२-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) मतदार संघातील ग्रामीण भागातील वीजेचे खांब विद्युत तारा कमकुवत व जीर्ण झाल्यामुळे अपघात टाळण्यासाठी सदर विद्युत खांब व तारा बदलण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१८ रोजी मा.उर्जामंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) करमाळा (जि.सोलापूर) मतदार संघातील ग्रामीण भागात विद्युत अपघात टाळण्यासाठी कमकुवत व जीर्ण झालेल्या तारा व विद्युत खांब बदलण्याबाबतचे सर्वेक्षण करुन तात्काळ आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करण्याची सूचना महावितरणमार्फत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने सर्वेक्षणचे काम पूर्ण झाले असून महावितरण कंपनीच्या बार्शी विभागांतर्गत उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी व रोहित्र यांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच करमाळा गावातील लघुदाब वाहिनीचे ३० विद्युत खांब व उच्चदाब वाहिनीची १.५ कि.मी. विद्युत तार बदलण्याचे काम एकात्मिक ऊर्जा विकास कार्यक्रमाअंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरित १२ खांब व २.५ कि.मी. विद्युत तार बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

महावितरण कंपनीच्या वतीने देण्यात येणाऱ्या मिटर रिडींग व विज देयकाच्या प्रिटींगचे काम राज्यातील महिला बचत गटांना देण्याबाबत

(३९) १३२८४९ (०६-१२-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या वतीने देण्यात येणाऱ्या मिटर रिडींग व विज देयके प्रिटींगचे काम राज्यातील महिला बचत गटांना देणेबाबत संचालक, महावितरण यांचे कार्यालयाने दिनांक १९ नोव्हेंबर, २००९ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याची मागणी मा.उर्जामंत्री महोदयांकडे लोकप्रतिनीधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ व ४ मे, २०१६ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीच्या परिपत्रकानुसार मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील मिटर रिडींग व विजबिल वाटपांच्या कामामध्ये महिला बचत गटांना प्राधान्य देत नसल्याने वारंवार तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही होत नाही, हे खरे आहे काय

(३)असल्यास, महिला बचत गटांना प्राधान्याने काम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महिला बचत गटांना प्राधान्यांने काम देणेबाबत कोल्हापूर जिल्हयातंर्गत बिल वाटपाचे काम ७ महिला बचत गटांना कंपनीच्या प्रचलित नियमानुसार देण्यात आलेले आहे व रिडिंग घेण्याचे काम ३ महिला बचत गटांना देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात सुरु असलेले भारनियमन रद्द करण्याबाबत

(४०) १३३०९७ (०७-१२-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात सुरु असलेले आठ तासांचे भारनियमन तात्काळ रद्द करण्यात यावे याकरिता फुलंब्री तहसील व महावितरण कार्यालयासमोर माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये निदर्शने करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात आठ तासांचे भारनियमन सुरु केल्यामुळे ग्रामीण भागात पाणीटंचाई निर्माण झाली असून विहिरी कोरडयाच असून त्यातच पिकांना तसेच जनावरांना पाणी देणे शक्य होत नसल्याने नागरिकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०५-२०१९) : (१) अंशत: खरे आहे. ऑक्टोबर महिन्यात कोळशामुळे विजेची उपलब्धता कमी झाल्यामुळे फुलंब्री तालुक्यासह संपूर्ण राज्यात कमी वसूली व जास्त वीज हानी असलेल्या (५८ टक्क्यांपेक्षा जास्त) "ग" गटातील अकृषक वाहिन्यांवर दिनांक ०८.१०.२०१८ ते २५.१०.२०१८ या कालावधीमध्ये गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले होते. परंतु या कारणास्तव फुलंब्री महावितरण कार्यालयासमोर माहे ऑक्टोबर, २०१८ दरम्यान निदर्शने करण्यात आली नाहीत.

(२) सदर कालावधीमध्ये शहरी व गावठाण विद्युत वाहिन्यांवर संध्याकाळचे (१८:३० ते २४:०० वाजेपर्यंत) भारनियमन करण्यात आलेले नाही. तसेच जशी वीजेची उपलब्धता वाढली तसे भारनियमन मागेही घेण्यात आलेले आहे. दिनांक २६.१०.२०१८ पासून राज्यात कुठेही भारनियमन होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चुंचाळे (गायरान) (जि.जळगावं) येथे नवीन ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारण्याबाबत

(४१) १३३२८४ (०७-१२-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा मतदार संघातील चुंचाळे (गायरान) (जि.जळगावं) येथे नवीन ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जून, २०१८ रोजी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने चुंचाळे (गायरान) येथे नवीन ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) चुंचाळे (गायरान) येथील नवीन ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारणी करण्याकरिता प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत आहे. उपकेंद्रासाठी लागणाऱ्या जागेच्या व आवश्यक निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम विचारात घेऊन उपकेंद्र उभारणीचे काम हाती घेण्याबाबत कार्यवाही नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्हयात कृषी पंप वीज जोडणी मिळावी याकरिता ६ हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी महावितरणकडे अनामत रकमेचा भरणा केल्याबाबत

(४२) १३३५३६ (०७-१२-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयात कृषीपंप वीज जोडणी मिळावी याकरिता ६ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी महावितरणकडे अनामत रकमेचा भरणा केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तथापि दिड ते दोन वर्षापासून या शेतकऱ्यांना कृषीपंप वीज जोडणी मिळाली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील प्रलंबित कृषीपंप वीज जोडणीची कामे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

वाशिम जिल्हयात मार्च, २०१८ अखेर अनामत रक्कम भरुन ७७३८ एवढे अर्ज प्रलंबित होते. सन २०१८-१९ मध्ये नोव्हेंबर अखेर २५०६ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या असून ५४४१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.
(२) हे खरे नाही.

वाशिम जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये २४९३, सन २०१७-१८ मध्ये २५८० व सन २०१९-१९ मध्ये नोव्हेंबर, २०१८ अखेर २५०६ एवढया कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या २,२४,७८५ कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDS) योजनेअंतर्गत वाशिम जिल्हयातील ६८८६ सभाव्य कृषीपंप ग्राहकांना वीजजोडणी देण्याचे नियोजित असून कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील कृषी पंपाच्या वीज जोडण्यांचे
प्रस्ताव अदयाप प्रलंबित असल्याबाबत

(४३) १३३५५६ (०७-१२-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील कृषी पंपाच्या वीज जोडण्यांचे ९६७ प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कृषी पंपाच्या वीज जोडण्याचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०१८ अखेर रत्नागिरी जिल्हयात ८६८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.
(२) रत्नागिरी जिल्हयात स्थानिक ठेकेदार फार कमी आहेत. तसेच रत्नागिरी जिल्हयातील अति दुर्गम व डोंगराळ भौगोलिक परिस्थितीमुळे कामे पूर्ण करण्यास विलंब होतो. कृषीपंपाच्या कामासाठी निविदा वारंवार काढून सुध्दा ठेकेदारांचा अत्यल्प प्रतिसादामुळे कृषीपंपाचे वीज जोडणी देण्याची कामे प्रलंबित राहतात.

(३) रत्नागिरी जिल्हयात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या ९४० कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली योजनेअंतर्गत वीज पुरवठा करुन वीज जोडण्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून चिपळूण, खेड विभागातील सर्व उपविभाग आणि रत्नागिरी विभागातील रत्नागिरी शहर, रत्नागिरी ग्रामीण १ व २ आणि संगमेश्वर उपविभागासाठी कृषीपंप ऊर्जीकरणकरिता दिनांक ०४.११.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच, रत्नागिरी विभागातील देवरुख, लांजा, राजापूर १ व २ या उपविभागातील प्रलंबित कृषीपंपाच्या कामासाठी निविदा प्रसिध्द केली असून निविदा प्रक्रिया पूर्ण होताच कार्यादेश देण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा जिल्हयात कृषी पंप वाटपाची योजना बंद असल्याबाबत

(४४) १३३८३५ (०७-१२-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयात सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणारी कृषी पंप वाटपाची योजना गेल्या वर्षभरापासून बंद असल्याने जिल्हयातील १५४ शेतकऱ्यांचे अर्ज महावितरणकडे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुबलक पाणी असूनही अनेक शेतकरी केवळ कृषी पंप नसल्यामुळे शेतीला पाणी देऊ शकत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१९) : (१), (२) व (३) महावितरणद्वारे पहील्या टप्प्यात अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत अटल सौर कृषीपंप योजनेची मंजूरी संपुष्टात आल्याने व त्यानंतर सुरु झालेल्या टप्प्यात ७००० नवीन सौर कृषीपंप आस्थापित करण्यास मंजूरी प्राप्त झाल्याने सदर काम महाऊर्जा (मेडा) मार्फत राबविण्यात येत आहे. दिनांक ८.१२.२०१७ नंतर बुलढाणा जिल्हयांतर्गत प्राप्त झालेले १९७ शेतकऱ्यांचे अर्ज महाऊर्जाकडे मंजुरीकरिता पाठविण्यात आले असून पुढील कार्यवाही नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोर,वेल्हा, मुळशी (जि.पुणे) हे तालुके दुर्गम भागात असुन येथील वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत

(४५) १३३८५० (०७-१२-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर, वेल्हा, मुळशी (जि.पुणे) हे तालुके दुर्गम भागात असुन येथील वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाटघर उपकेंद्र हे महानिर्मिती कंपनीकडून महापारेषण कंपनीकडे हस्तांतरित झाले आहे परंतू सदर पारेषण कंपनीमार्फत ते अद्ययावत होणे आवश्यक असुनही ते न होणे तसेच संबंधित उपविभागात कायमस्वरुपी मंजूर असलेली तांत्रिक कर्मचा-यांची ८० पदे असून त्यापैकी ३३ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) अंशत: खरे आहे. मुळशी, जि. पुणे विभागामध्ये भोर व वेल्हा हे तालुके अतिशय दुर्गम भागात असल्याने वादळी वारे, पाऊस किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे या भागात काही वेळा वीज पुरवठा खंडीत होतो, परंतु तो पूर्ववत करण्यात येतो.

(२) व (३) दिनांक १.११.२०१७ रोजी १३२ के.व्ही. भाटघर उपकेंद्र महानिर्मितीकडून महापारेषणकडे हस्तांतरित झाले आहे. सदर उपकेंद्रात तांत्रिक वर्गाची ९ पदे मंजूर असून ४ पदे नियमित कार्यरत आहेत व उर्वरित ५ पैकी ४ पदे बाह्यस्त्रोतातून भरण्यात आली आहेत. या उपकेंद्रातील जुनी उपकरणे बदलून त्या जागी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त उच्च क्षमतेची नवी उपकरणे, तसेच नवीन स्थापत्य संरचना व नियंत्रण कक्ष उभारणीचा प्रस्ताव महापारेषण कंपनीच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्वच शासकीय कार्यालयांना सौर उर्जा वापराचे बंधन घालण्याच्या घोषणेबाबत

(४६) १३४०५९ (०७-१२-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच शासकीय इमारतींची रचना पर्यावरण पूरक तत्त्वावर करुन सौर ऊर्जेच्या माध्यमातून शासकीय कार्यालयांचा कायापालट करण्याची घोषणा मा. ऊर्जा मंत्री यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पुणे येथे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उक्त योजना राबविल्यानंतर किती प्रमाणात विजेची बचत होणार आहे,
(४) असल्यास, उक्त योजना राबवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०५-२०१९) : (१), (२), (३), (४) व (५) शासकीय इमारतीवर Roof top Solar प्रकल्प राबविणे विषयीच्या केंद्र शासनाकडील दि.०५ जुलै, २०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने सर्व संबंधीतांना शासनाच्या दि.२७ सप्टेंबर, २०१८ च्या पत्रान्वये महाऊर्जाशी संपर्क साधून महाऊर्जामार्फत शासकीय इमारतीवर Roop top Solar प्रकल्प राबविणेबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच केंद्र शासनाव्दारे शासकीय इमारतीवर आस्थापित होणाऱ्या सौर विद्युत प्रकल्पाकरिता राज्यासाठी १० मेगावॅट क्षमता प्रोत्साहन भत्यासाठी अनुज्ञेय ठरविलेले असून त्यादृष्टीने केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

खेड तालुक्यातील (जि.पुणे) पिंपळगाव-गोलेगाव येथे विजेच्या धक्क्याने जनावरांचा मृत्यू झाल्याबाबत

(४७) १३४०७३ (०७-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) पिंपळगाव-गोलेगाव येथे थ्री-फेज वीजवाहिनीच्या तारा तुटून पडल्यामुळे शेतकरी श्री.सोपान अमृता शेळके यांच्या चार जनावरांचा मृत्यू होवून सुमारे सव्वातीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेच सदर घटना घडल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी केली असून शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची मागणीही ग्रामस्थांनी केली आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, वीजवाहक तारा तुटण्याच्या घटनेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

दिनांक ३०.०९.२०१८ रोजी जोरदार वादळ व पावसामुळे थ्री-फेज वाहिनीच्या तारा तुटल्या व सदर तारांच्या संपर्कात येऊन श्री.सोपान अमृता शेळके यांच्या दोन म्हशी, एक रेडा व एक बैल यांचे विजेच्या धक्क्याने प्राणांतिक अपघात झाला.

(२) हे खरे आहे. श्री सोपान अमृता शेळके यांनी नुकसान भरपाई मिळण्याकरिता मागणी केली आहे.

(३) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, पुणे कार्यालयामार्फत करण्यात आली असून नुकसान भरपाई देण्यासंबंधीची कार्यवाही महावितरण कंपनीच्या नियमानुसार सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नंदुरबार व धुळे जिल्ह्यातील २२ उपसा सिंचन योजना विद्युत देयक थकीत असल्यामुळे बंद पडल्याबाबत

(४८) १३४०९० (०७-१२-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार व धुळे जिल्ह्यातील २२ उपसा सिंचन योजना विद्युत देयक थकीत असल्यामुळे बंद पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकीत विद्युत देयकावरील व्याज व दंड माफ करुन मुळ मुद्दल रक्कम भरणेसाठी किमान समान ६० मासिक हप्त्यात भरण्यास परवानगी मिळून एक हप्ता स्वीकारुन विद्युत पुरवठा पूर्ववत करण्याबाबत मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) थकीत विद्युत देयकांची मूळ रक्कम (व्याज व दंड वगळून) समान ३० मासिक हप्त्यामध्ये भरण्यास शासनाकडून मंजूरी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी शाळा संहिता सुधारणेस मान्यता देण्याबाबत

(४९) १३४०९२ (०७-१२-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळा संहितेत दुरुस्ती करुन शासनास मसुदा सादर करण्यासाठी शासनाने समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,
(२) सदरहू समितीने अनेकवेळा बैठका घेऊन दुरुस्ती मसुदा शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) तथापि, सदरहू समितीने सुचविलेल्या दुरुस्त्या विश्वासात न घेता आश्रमशाळा समिती सुधारणांच्या कामास विलंब लावत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे दिनांक ९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या बैठकीस मान्यता दिल्याप्रमाणे आश्रमशाळा संहितेच्या दुरुस्तीस तात्काळ मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णू सवरा (०६-०६-२०१९) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) समितीने सुचविलेल्या दुरुस्त्या विचारात घेऊन सुधारीत आश्रमशाळा संहितेस दि.०८.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

औसा (जि.लातूर) तालुक्यात महावितरणच्या औसा उपविभागांतर्गत जळलेल्या व नादुरुस्त झालेल्या रोहित्रांबाबत

(५०) १३४७७१ (०७-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात औसा तालुक्यात महावितरणच्या औसा उपविभागांतर्गत सन २०१७-१८ मध्ये शेतीपंपाची जळलेली रोहित्र बदलून वा दुरुस्त करून बसवण्यास व बंद विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करण्यास एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी लागला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालावधीत शेतकऱ्यांचा शेती पंपाचा विद्युत पुरवठा बंद राहिला असून सदर कालावधीत ऐकून किती रोहित्र जळाली असून सदर रोहित्र दुरुस्त करून बसवण्यास सरासरी किती कालावधी लागला आहे,
(४) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०५-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) औसा उपविभागात सन २०१७-१८ या कालावधीमध्ये नादुरुस्त झालेली एकूण २७१ रोहित्रे, ही उपलब्धता व विभागस्तरीय जेष्ठता यादीनुसार सरासरी ११ दिवसांच्या कालावधीत बदलण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.